# फाईव्ह स्टार न्यूज

वर्ष 11 वे | एप्रिल 2024 | अंक 124 वा

MAKH
















रजि. नं. महा/23991/कोल्हापूर, एफ्/21258/कोल्हापूर

MAKH
स्था.: 04-08-2007

## मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले (मॅक)

प्लॉट नं. पी-4, ए एम्-28, मॅक चौक, पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, कागल-हातकणंगले, जि. कोल्हापूर-416 236.
ऑफिस फोन: (0231) 2305373. मोबा.: 8530445373, 9561445374
E-mail : presidentmakh@gmail.com | Website : **www.makhkolhapur.org**

## We Supply



### Plumbing Material
uPVC & PVC, HDEP, Large Dia GI & MS & SS, cPVC Pipes & Fitting etc.



### Safety Item
Safety Belts, Jackets, Shoes, Goggles, Ear Plugs/ Mufflers, Masks, various type of gloves, Safety Nets etc.

### Standard Star Couplings / Spider Couplings
Love Joy Coupling, Star Coupling



### [illegible]
Rod, Cable, Holder, Gas Cutter Hose, Welding Hand crews, Cylinder Key, Pressure Regulator, Welding Torch & accessories, CO2 Mig Welding Wire, CO2 Contact Tip, Tip Holder, Diffuser, CO2 Liner, Conical Nozzle





### Fasteners
Regular/ Hardened (TVS Unbrako) Nut Bolts, Anchor Fasteners, Foundation Bolts Allen Bolts. Roofing Bolts/ Screws, Al Rivets.



### Industrial Lubricants
Hydraulic Oil, Cutting Oil, Break Oil, Food Grade Oil and various types of Grease etc.



# KOLHAPUR TRADING PVT. LTD.

Single Source Destination For Your Multiple Requirements

Gat No. 356/2 K Five Star MIDC Road, Kagal, Kolhapur 416216
Head Office : 0231-2620315, 2625394 Fax 0231-2620019
Shop : 9921942552, 9921925885



### Packing Material
Strap Hand Tensioner & sealer, Plastic Sutli, Packing Clips, BOPP Tape, Water Gummed Tape, Stretch Film, Packing Patti (Pet/PP), & Bubble Sheet etc...



### Pneumatic Fitting
Air Blow Guns, PU Pneumatic Pipe And Its Fittings , Pneumatic Control Valves.

### Paints
Industrial (Emulsion, Oil, [illegible]), Water Thinners, Acrylic, [illegible] [illegible]



### Electric Item
Wires, Cables, Switches, Halogen fitting & Tubes, Aluminium Lugs, Shock Proof Hand gloves, GI Cable Tray, Spark Free Light Fittings etc.





### Cleaning Items
Naphthalene Balls, Liquid Soap, Floor Cleaner, Dust Bin, Dust Control Mop, Floor Wiper, Hard Broom, Broom Pipe, Washing Brush, Supli.

### Hand Tools
The complete hand tool shop with a quality range of tools. Make :- Taparia & Jhalani



**And Further...** Samruddhi Unbreakable Plastic Utensils, Roofing Sheet, Electric Hand Tools, Construction Chemical Accessories, Cement , Adhesive Items , Abrasive Item, Stationery Items, Industrial Lubricants

E-mail Id :- ktpl.kagal@ksmgroup.co.in


|| श्री जोतिर्लिंग प्रसन्न ||
adh
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
www.adhiengineering.in
Mr. Amol D. Khambe
8087341176
9595525363
Box Type Single Girder Eot Crane
www.adhiengineering.in
www.adhiengineering.in
Double Girder Overhead Cranes
JIB Crane
Scissor Lift Table
Single Girder E.O.T. Crane
Wire Rope Hoist
Modular Wire Rope Hoist
DSL Busbar System
Air Compressor PPR FR Blue Pipeline & Fittings
Reciprocating Air Compressor
Screw Air Compressor
Refrigerated Air Dryer
Chain Hoist
Manual Stacker
Semi Electric Stacker
Fully Electric Stacker
Electric Paper Reel Stacker
Manual Drum Tilter & Lifter
Hydraulic Beam Shifting Trolley
Pallet Truck
Dock Levellers
Single Mast Goods Lift
All Types of Elevator
Aluminium Air Pipe Line
Weight Crane Scale
Webbing Sling
Radio Remote
Push Button Pendant
Filter Element & Filter
LLDPE TUBE
Zero Air Loss Drain Valves
Tec44 Auto Drain Valves
Auto Drain Valves
Compressed Air Fittings
Magnetic Lifter
Mini Electric Hoist
Helical Gear Motor
Hydraulic Puller
Engine Crane
Construction Mini Crane
Geared Trolley
Chain Pulley Block
Electric Winch
Pneumatic-Grease Pump
Hydraulic Service Lift
Vehicle Washer
High-Bay Lights
Street Lights
LED Flood Lights
LED Tube Light
Racking System
Mr. Amol D. Khambe
9595525363
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
8087341176
Kiran Bungalow, M. G. Patil Chowk, Patil Galli, Unchgaon, Kolhapur-416005. Maharashtra.
email : adhiengineering8485@gmail.com, info.adhiengineering@gmail.com
Website : www.adhiengineering.in
GST No. 27ABEFA3201G1Z1

# PRECISE PEB PVT. LTD.


- Plot No. D 112/3, Kagal-Hat. five star MIDC, Kolhapur, Maharashtra-416216
- Mob. 9921063063 / 7083729009
- Email : info@precisepeb.com
- Website : www.precisepeb.com
- CIN - U45309PN2019PTC184729


**PRECISE PEB** is a full service metal building construction company with the aim to provide quality steel buildings while delivering prompt personalized and professional service. If you can imagine a project, we can build the steel structure to fit your needs. From Farm Buildings to Retail Buildings, Warehouses, Garages / Workshops and specialized applications, **PRECISE PEB** has the expertise and experience to complete your project on time and on budget with civil & building.

## WE PROVIDE - END TO END

- Concept & Architectural Solution in PEB
- Site development / Design Build services (Civil works)
- Supply & installation of steel building and related work.
- Overall responsibility and interface lionising.
- Work shop facility Pullthrow & Palzma cutting machine

## PEB ADVANTAGE

- Larger span
- Faster construction & Completion
- Cost efficiency
- Economical
- Control Quality
- Strength & Stability
















Sanjay D. Pendse
9422044216

Subodh S. Pendse
9922960961

KP
SINCE 1988

# KAYPEE MACHINES PVT. LTD.

A-249, Five Star MIDC, Kagal,
Kolhapur - 416 236

**9922960955, 0231-2305129**

kaypeemachineskop@gmail.com

**Manufacturers of-**

- **Engineering & Auto Component Precision Machining.**
- **Patterns & Dies, Jigs, Fixtures, SPM's.**
- **Spares for Various Machines & Equipments.**
- **Power Chucks Reconditioning.**
- **Machine Maintenance Services.**

Near Suresh Machinery,
Shivaji Udyamnagar, Kolhapur-416 008.

**9922960956, 9922960950**

sales.kaypeemachines@gmail.com

**Dealers in -**

- **Machines & Equipments.**
- **Material Handling Equipments.**
- **Laser Cutting Machines.**
- **Plasma Cutting Machines.**
- **Inspection Equipments.**
- **Machine Tool Accessories.**



DMW

# DYNAMIC METAL WORKS

**Manufacturer's of**

**1. ALUMINUM CASTING, HEAT TREATMENT & SHOT BLASTING**

**2. S G IRON & CI CASTINGS**

**HARISHCHANDRA S. DHOTRE**

**President :**

Manufacturers Assocation Kagal, Hatkangale, Kolhapur.
Yog Viday Dham, kolahpur.
Akhil Gurav Samaj Sanghtna, Kolahpur Dist.

---

**HARSHWARDHAN H. DHOTRE**
Mob.8600151546

Factory : Plot No. B-41, Five Star MIDC, Kagal,
Dist. Kolhapur-416 236.
Ph. No. 0231-2305173
Mobile : 9422412903
Email : dynamicmetal1@hotmail.com
Website : www.dynamicmetalworks.in



DARSHAN
COLOUR COATED SHEETS

# DARSHAN ENTERPRISE

**Mfg. PPGI Colour Coated Sheets**



## Roofing Sheets



## Linear Sheets



Bending Sheets



Doom Bending



Self Tapping Screw



Corner Flash



Redges

Light Blue

Off White

Brick Red

Mist Green

Reliance Green

D-42, Behind Mantri Metallics,5 Star MIDC, Hupari Road, Kagal, Tal. Hatkanangale, Kolhapur - 416236

**Contact - 9922627774**


Industrial Automation
PLC Based Electrical Panels
MCC and Distribution Panles
Industrial Furnace Panels
APFC Panels
Electrical Switchgears
Lighting and Time bell Panels
Shree
|| Sadgurukrupa||
Automation
ISO 9001-2015
Industrial Automation & Electrial panels manufacturing company
Address : G-66, Kagal Five Star MIDC, Kagal, Kolhapur. Mob. 8308949500
Email : suresh.sadgurukrupaautomation@gmail.com


SHREE
SAMARTH KRUPA
E MART
आता कोल्हापूरला जायची गरज नाही
इलेक्ट्रीकल
इलेक्टॉनिक्स्
ॲटोमेशन प्रॉडक्ट
सर्व ई प्रॉडक्टस् आपल्या कागल पंचतारांकित एमआयडीसीत.
CONNECT US FOR YOUR
POWERFUL BUSINESS
Plot No. P4, Makh Association Building, Makh Chowk, Kagal - Hatkanangale MIDC.
8308949500, 9373762980


FUSION AQUA
FUSION AQUA
MANUFACTURER OF HDPE, PVC &
HYDROPHONICS PIPES & FITTINGS
Plot No. A-233, Kagal-Hatakangale Road,
Five Star MIDC, Kagal, Kolhapur-416 236.
+91 9960376869, +91 9960399494,
+91 9960392424, Off.: +91 9309977494
contact@fusionaqua.in
www.fusionaqua.in
ISO 9001-2015
Certified Mfg.Company
MJP Approved
IS:4984/3016
ISI
CM/L 7500589947
MORE
STRENTH
HIGHEST
DURABILITY
HDPE
PIPES
MDPE
PIPES
FITTINGS
HDPE PIPES OF DIAMETER
20MM TO 200MM
MANTRA : 9822518735, 7385304534



## संपादकीय

फाईव्ह स्टार न्यूज
एप्रिल २०२४

# विकासाचा गुढीपाडवा

**गुढीपाडव्याचा सण, आता उभारा रे गुढी । नव्या वरसाचं देनं सोडा मनातली आढी**

अशा शब्दांत खान्देशातील लेवा पाटीदार गणबोलीत बहिणाबाई चौधरी यांनी गुढीपाडव्याचे वर्णन केले आहे. पौराणिक कथेनुसार, श्रीराम वनवासातून पुन्हा अयोध्येला परत आले म्हणून गुढीपाडवा साजरा केला जातो. म्हणूनच यशाची गुढी उभारली जाते. एका कथेनुसार, पार्वती आणि शंकराचे लग्न पाडव्याला ठरले आणि ते तृतीयेला झाले, म्हणूनच या दिवशी आदिशक्ती पार्वतीची पूजा केली जाते. याच दिवशी ब्रह्मदेवाने विश्वनिर्मिती केली, असा उल्लेखही वेदात आहे. महाभारताच्या आदिपर्वात वसू राजाने, इंद्राने त्याला दिलेली कळकाची म्हणजेच बांबूची काठी जमिनीत रोवली आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीला तिची पूजा केली. या परंपरेचा आदर राखण्यासाठी गुढीपूजन केले जाते, असे म्हटले जाते. चैत्र महिन्यापासून वसंत ऋतूचे आगमन होते. जुनी सुकलेली पाने गळून झाडांना नवी पालवी फुटते. वातावरणात वाढलेल्या उन्हाची काहिली कमी करण्यासाठी गुढीमध्ये कडुनिंबाची पाने लावली जातात. प्राचीन काळापासून चैत्र शुद्ध प्रतिपदेला ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर हे कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात, कडुनिंबामुळे पचनक्रिया सुधारणे, पित्ताचा नाश होणे, त्वचारोग बरे होणे, धान्यातील कीड थांबवणे हे सर्व शक्य होते. कडुनिंबात अनेक गुण असल्याकारणाने याला आयुर्वेदातही खूप महत्त्व आहे. शरीराला थंडावा देणारी कडुनिंबाची पाने पाण्यात घालून स्नानही केले जाते.

मराठी नववर्षाची सुरुवात याच दिवशी होते. सार्वजनिक ठिकाणी चौकाचौकात रांगोळ्या काढल्या जातात. पारंपरिक वेशभूषेत शोभायात्रा काढली जाते. सगळीकडे आनंदोल्हासाचे वातावरण असते. या पारंपरिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सवाचे आजच्या संदर्भाने महत्त्व काय, या प्रश्नाचे उत्तर साहजिकच सर्वसामान्य माणसाच्या जगण्यात आणि जीवनमानात त्याने काय फरक पडणार आहे त्याचबरोबर ते कितपत आणि कसे सुसह्य होणार, यात सापडते वा शोधले गेले पाहिजे. ते शोधताना काही गोष्टींची नोंद आवश्यक ठरते. विशेषत: देशाच्या आर्थिक आघाडीवर नेमके काय सुरु आहे, त्यातून ते काही प्रमाणात स्पष्ट होऊ शकते.

2024-25 या आर्थिक वर्षात प्रारंभिक समभाग विक्री, म्हणजेच आयपीओमधून एक लाख कोटी रुपयांहून अधिक निधी उभारला जाण्याची शक्यता आहे. सरलेल्या वर्षात 62 हजार कोटी रुपयांची भांडवल उभारणी याप्रकारे झाली. देशांतर्गत आघाडीवर सुधारलेली अर्थस्थिती, उद्योजकांमधील उत्साह, अनुकूल सरकारी धोरणे आणि वाढलेली थेट परकीय गुंतवणूक या घटकांच्या मिलाफामुळे बाजारातील आशावादात भर पडताना दिसते. अमेरिकेतील टेस्ला मोटर्स ही इलेक्ट्रिक कार कंपनी भारतात दोन ते तीन अ ज डॉलर गुंतवणुकीचा प्रकल्प उभारणार असून, मोठी रोजगार संधी मिळणार आहे. रिझर्व्ह बँकेनेही नुकतेच नवे पतधोरण जाहीर केले असून, साडेसहा टक्के हा व्याजदर कायम ठेवला. रेपोदरात वाढ केलेली नसल्यामुळे, गृहकर्ज, वैयक्तिक कर्ज किंवा वाहन कर्जाच्या व्याजदरातही वाढ होणार नाही, हा एक दिलासा म्हणायला हवा. भाववाढ नियंत्रणात राहावी यासाठी रिझर्व्ह बँक ही काळजी घेत आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीनेही नवी शिखरे गाठली असून, त्यामुळे गुंतवणूकदारही खूश आहेत. देशांतर्गत बाजारपेठेत दहा ग्रॅम सोन्याचा भाव 73 हजार रुपयांवर जाऊन पोहोचला. फेडरल रिझर्व्ह या अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेने व्याजदर कपातीची शक्यता वर्तवल्यामुळे जगभरच्याच वायदे सौद्यांत सोन्याने उसळी घेतली. देशांतर्गतच व्यवहारांमुळे मार्च 2024 मध्ये वस्तू आणि सेवाकर अर्थात जीएसटी संकलन वार्षिक तुलनेत 11.5 टक्क्यांनी वाढून, ते 1.78 लाख कोटी रुपये नोंदवले गेले. हे आजवरचे सर्वोच्च दुसरे असे मासिक संकलन आहे. एप्रिल 2023 ते मार्च 2024 या कालावधीत जीएसटी संकलन 11.7 टक्क्यांनी वाढून, ते एकूण 20 लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले.

संस्थापक संपादक : **श्री. अशोक दुधाणे**
सहसंपादक : **श्री. संजय पेंडसे**
अध्यक्ष : **श्री. हरिश्चंद्र धोत्रे**
उपाध्यक्ष : **श्री. मोहन कुशिरे**
सचिव : **श्री. विठ्ठल पाटील**
खजानिस : **श्री. सुरेश क्षीरसागर**

**फाईव्ह स्टार न्यूज मासिक जाहिरात दरपत्रक**

| जाहिरातीचे प्रकार | मासिक दर | वार्षिक दर |
|---|---|---|
| पूर्ण पान-रंगीत (कव्हर पेज मागील) | - | २५,०००/- |
| पूर्ण पान-रंगीत (आतील पान) | - | २०,०००/- |
| अर्धे पान-रंगीत (आतील पान) | - | १०,०००/- |
| पूर्ण पान (कृष्णधवल) | ₹ १,४००/- | ₹ १६,०००/- |
| अर्धे पान (कृष्णधवल) | ₹ ८००/- | ₹ ९,५००/- |

**जाहिरातीसाठी संपर्क : 8530445373, 9561445374**

मुद्रक : मॅक पंचतारांकीत एम्. आय.डी.सी. यांनी 'फाईव्ह स्टार न्यूज' या नावाने 'मंत्र', राजारामपुरी १३ वी गल्ली, कोल्हापूर येथे छापून मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, फाईव्ह स्टार एम्. आय.डी.सी., कागल-हातकणंगले येथून प्रकाशित केले.

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| क्षणचित्रे | 2 |
| सहकार क्षेत्राचा 'मोकळा श्वास' | 8 |
| दिलासादारक वेतनसुधारणा | 11 |
| लाट उष्णतेची, गरज सजगतेची | 13 |
| बदललेली लोकशाही | 16 |
| बंगळुरुचा इशारा | 19 |
| खरेदी-विक्री संदर्भात हाय कोर्टाचे काही महत्वाचे निर्णय | 23 |



मऔवि महामंडळ कोल्हापूरच्या कार्यकारी अभियंतापदी श्री. विराप्पा नाईकसाहेब यांची निवड झाल्याबद्दल मॅकच्या वतीने सत्कार करताना मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे समवेत इतर पदाधिकारी

## ग्रामपंचायत कर आकारणी बाबत बैठक संपन्न



ग्रामपंचायत कर आकारणी बाबत ग्रामपंचायत पदाधिकारी,
मऔवि महामंडळ अधिकारी, मॅक पदाधिकारी व मान्यवर उद्योजक यांची बैठक संपन्न



# मॅकच्या नूतन कॉन्फरन्स हॉल बाबत बैठक संपन्न



मॅकच्या नूतन इमारतीमध्ये होत असलेल्या कॉन्फरन्स हॉल बाबत
मा. सचिन शिरगांवकर साहेब, चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर, सिनर्जी ग्रीन इंडस्ट्रीज् लि.,
यांच्या सोबत सविस्तर चर्चा करताना मॅकचे पदाधिकारी व आर्किटेक्ट






मॅकचे ऑन. ट्रेझरर व सद्गुरू ऑटोमेशनचे प्रोप्रा. सुरेश क्षीरसागर यांच्या सहकार्याने
मॅक येथे पाणपोईची सुविधा मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे यांच्या शुभहस्ते सुरू

# मा.ना.श्री. उदयजी सामंतसाहेब, उद्योगमंत्री यांचा जाहीर सत्कार सोहळा



मा.ना.श्री. उदयजी सामंतसाहेब, उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रामधील विविध सोई-सुविधा करणेसाठी ७९ कोटी १६ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मॅकच्या वतीने जाहीर सत्कार करताना मॅकचे पदाधिकारी



मा.ना.श्री. उदयजी सामंतसाहेब, उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी विविध सोई-सुविधा करणेसाठी एकूण १५६.७५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्व औद्योगिक संघटनांच्या वतीने कृतज्ञता व विशेष आभार व्यक्त करताना मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे समवेत मान्यवर व उपस्थित उद्योजक बंधू



मा.खासदार श्री. धनंजय महाडीकसाहेब यांनी ईएसआय हॉस्पिटल व कोल्हापूर विमानतळ उभारणी करिता मोलाचे सहकार्य केल्याबद्दल मॅकच्या वतीने जाहीर सत्कार करताना मॅकचे पदाधिकारी व इतर असोसिएशनचे पदाधिकारी



मा.खासदार श्री. संजयजी मंडलिकसाहेब यांनी पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात ईएसआय हॉस्पिटल सुरू केल्याबद्दल मा. विरेंद्र मंडलिकसाहेब यांचा मॅकच्या वतीने जाहीर सत्कार करताना मॅकचे पदाधिकारी

# स्ट्राईव्ह प्रोजेक्ट



स्ट्राईव्ह प्रोजेक्ट अंतर्गत **M/s. PHOENIX INDUSTRIES** या कंपनीमध्ये
**CNC PROGRAMMER CUM OPERATOR** या ट्रेडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या
अप्रेंटिसशिप कामकाजाची पाहणी करताना मॅकचे पदाधिकारी व स्ट्राईव्ह कमिटी



स्ट्राईव्ह प्रोजेक्ट अंतर्गत मे. लक्ष्मी पंप्स प्रा.लि. या कंपनीमध्ये **WELDER** या ट्रेडच्या
माध्यमातून विद्यार्थ्यांचे अप्रेंटिसशिप काम सुरू

# भावपूर्ण श्रद्धांजली



## कै. मनोहर राधेश्याम शर्मा

संस्थापक अध्यक्ष, मॅक



मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले (मॅक) चे संस्थापक अध्यक्ष **कै. मनोहर राधेश्याम शर्मा** यांचे दि. २० एप्रिल २०२४ रोजी आकस्मित दुःखद निधन झाले. त्यानिमित्त मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले (मॅक) च्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना मॅक पदाधिकारी, सत्यन शर्मा तसेच शर्मा परिवारातील सदस्य व मॅक मान्यवर सभासद बंधू-भगिनी



# सहकार क्षेत्राचा 'मोकळा श्वास'

दीनानाथ ठाकूर
'सहकार भारती'चे राष्ट्रीय अध्यक्ष



***केंद्र सरकारने सहकारी क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केल्यानंतर एकेकाळी काही लोकांच्या हातात सामावलेले सहकार क्षेत्र आता विकासाच्या वाटेवर आहे. या क्षेत्रात कायदेशीर सुधारणा, नियम आणि कार्यप्रणालीतील सुधारणांबरोबरच व्यवसायासमोरची आव्हाने दूर करण्याची व्यवस्था देखील केली आहे. स्थानिक पातळीवर सहकारी सोसायटीच्या उत्पादनाला बाजार उपलब्ध करून देणे याचाही यात समावेश आहे. यासाठी तीन सहकारी सोसायट्यांची निर्मिती करण्यात आली असून त्याचा प्रभाव 'पॅक्स' पातळीपासून राष्ट्रीय स्तरापर्यंत पाहवयास मिळेल. अन्न सुरक्षेच्या दिशेने देखील सहकार क्षेत्र शेतीसाठी लागणारे प्रमुख घटक उपलब्ध करून देण्यापासून ते शेतीमाल साठवणूक करण्यासाठी गोदामांची निर्मिती करणे आणि अतिरिक्त उत्पादनाची निर्यात करण्याची योजना देखील फलद्रुप होताना दिसत आहे.***

---

एकमेकांचा हात हातात घेऊन वाटचाल करणाऱ्या सहकार क्षेत्रासाठी सध्याच्या काळ क्रांतिकारी आहे, असे म्हटलं तर वावगं ठरणार नाही. काही काळापूर्वी कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे सहकार क्षेत्रावरचा ढळणारा विश्वास आणि त्यागभावना आता नव्याने आणि जोमाने प्रस्थापित होताना दिसत आहे. सहकार क्षेत्रातील बहुप्रतिक्षित कायदा सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ही बाब शक्य झाली आहे. या सुधारणांमुळे आतापर्यंत एका विशिष्ट चौकटीत वावरणाऱ्या सहकार क्षेत्राला एकप्रकारे मोकळे आकाशच मिळाले आहे. शेतकरी, गरीब, वंचित, महिला आणि तरुणांसाठी सहकारी क्षेत्रातील सुधारणा लाभदायी असल्याचे सिद्ध होत आहे. बियाणे, सेंद्रिय शेती आणि सहकारी उत्पादनांच्या निर्यातीसाठी नेमलेल्या राष्ट्रीय सहकारी सोसायट्या आता कॉर्पोरेट सेक्टरशी मुकाबला करण्यास सज्ज झाल्या आहेत. याप्रमाणे ग्रामीण विकासाच्या माध्यमातून अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी सर्वाधिक योगदान याच क्षेत्राचे राहणार आहे. दुग्ध क्षेत्रातील सहकारी सोसायटी अमूल आणि फर्टिलाजझर क्षेत्रातील सहकारी सोसायटी इफको या

जागतिक पातळीवर बहुचर्चित ब्रँड म्हणून नावारुपास आल्या आहेत. देशातील एकुण फर्टिलायझर उत्पादन आणि वितरणात सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे.

साखर उद्योगही मूठभर लोकांच्या हाती गेला होता आणि त्याचा हस्तक्षेप देशाच्या राजकारणात देखील सतत दिसायचा. त्यामुळे त्यात सुधारणा करण्याचा कधीही विचार केला गेला नाही. उत्तर भारतातील सहकारी कारखाने ही जवळपास बंदच पडली आहेत. काही क्षेत्र वगळता सहकाराचा प्रसार अन्य क्षेत्रात होऊ शकला नाही. त्याचवेळी बँकिंगपासून लहान मोठ्या क्षेत्रात सहकाराचा प्रभाव राहिला आहे. वास्तविक गेल्या ६०-६५ वर्षांत सहकार क्षेत्राचे महत्त्व ओळखण्याचाच प्रयत्न झाला नाही आणि हे कटूसत्य आहे. या क्षेत्राला प्रोत्साहित करण्यासाठी धोरण आखण्यासंदर्भात मागील सरकारची उदासिन भूमिका कारणीभूत होती. परंतु आता स्थितीत बदल झाला आहे.



मोदी सरकारने सहकारी क्षेत्रासाठी सर्वात महत्त्वाचे पाऊल टाकत सहकार मंत्रालयाची स्थापना केली. केंद्रीय मंत्री अमित शहा यांना यामंत्रालयाची जबाबदारी मिळाल्यानंतर या क्षेत्राची पकड आणखी मजबूत झाली आहे. एकेकाळी काही लोकांच्या हातात सामावलेले सहकार क्षेत्र आता विकासाच्या वाटेवर आहे. राज्यस्तरीय कनिष्ठ पातळीवरची संस्था प्राथमिक कृषी कर्ज सोसायटी (पॅक्स) शी संबंधित नियमांत बदल करण्यात आले आहेत. यानुसार शेतकऱ्यांसाठी त्यांचे दरवाजे चोवीस तास खुले राहतील. राज्यांनी देखील हे बदल सहजपणे स्वीकारले. सदस्यत्व अभियान राबविण्यात आले. डिजिटल क्रांतीचा लाभ घेण्यासाठी सहकार क्षेत्रात संगणक आणि इंटरनेचा वापर सुरू झाला. ग्राम पंचायत पातळीवरच्या सोसायट्या थेटपणे जिल्हा, राज्य आणि केंद्र सहकारी संस्थांशी जोडल्या गेल्या. चिठ्ठीची जागा ई मेलने घेतली आणि बटण दाबताच सहकारी सदस्यांच्या खात्यांत त्यांचा वाटा पोचू लागला.

सहकार क्षेत्रातील सुधारणांमुळे सहकारी संस्थांच्या व्यावसायिककार्यक्षेत्राचा देखील विस्तार झाला. या माध्यमांतून आज स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल पंप, बॅंकिंग मित्र, स्वस्त धान्य दुकान (पीडीएस) तसेच सार्वजनिक सेवा केंद्र आणि जेनेरिक औषधी केंद्र यासारख्या दोन डझनपेक्षा अधिक क्षेत्रांना प्राधान्य दिले जावू लागले आहे. सहकारी क्षेत्राचे दरवाजे सर्वांसाठी खुले केल्याने सदस्यत्व स्वीकारण्याबाबत उत्साह वाढला आहे. त्यामुळे लोकांना स्थानिक पातळीर रोजगार मिळत आहे. तसेच अन्य सहकारी संस्थांना अर्थसाह्य करण्याचा मार्ग देखील मोकळा झाला आहे. आजघडीला राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (एनसीडीसी) ची कर्ज देण्याची क्षमता २५ हजार कोटी रुपयांवरून १.२५ लाख कोटींवर पोचलीआहे.

सहकारी बँकांची देखील भरभराट होत आहे. त्यांच्यावरचे निर्बंध काढण्याबरोबरच त्यांच्यासाठी नियमावली देखील तयार करण्यात आली आहे. नवीन शाखा सुरू करण्याबरोबरच वन टाइम सेटलमेंटसारख्या सुविधा देखील त्यांना मिळणार आहेत. सहकारी क्षेत्रात कायदेशीर सुधारणा करण्याबरोबरच नियमांत सुधारणा आणि कार्यप्रणालीतील सुधारणांबरोबरच व्यवसायासमोरचे असणारे आव्हान दूर करण्याची व्यवस्था देखील केली आहे. स्थानिक पातळीवर सहकारी सोसायटीच्या उत्पादनाला बाजार उपलब्ध करून देणे याचाही यात समावेश आहे. यासाठी तीन सहकारी सोसायट्यांची निर्मिती करण्यात आली असून

त्याचा प्रभाव ‘पॅक्स’ पातळीपासून राष्ट्रीय स्तरापर्यंत पाहवयास मिळेल. अन्न सुरक्षेच्या दिशेने देखील सहकार क्षेत्र शेतीसाठी लागणारे प्रमुख घटक उपलब्ध करून देण्यापासून ते शेतीमाल साठवणूक करण्यासाठी गोदामांची निर्मिती करणे आणि अतिरिक्त उत्पादनाची निर्यात करण्याची योजना देखील फलद्रुप होताना दिसत आहे. एक लाख कोटी रुपये खर्चाच्या जगातील सर्वात मोठी साठवण क्षमता योजनेनुसार सहकार क्षेत्राच्या माध्यमातून गावागावात गोदामांची निर्मिती केली जात आहे. त्यामुळे पिक कापणीनंतर २७ टक्क्यांपर्यंतचे होणारे संभाव्य नुकसान कमी होण्यास मदत मिळणार आहे. कृषी क्षेत्रातील विकासाचा दर स्थिर होत असल्याचे पाहून सहकारक्षेत्र मत्स्य पालन, पशुपालन, दुग्ध क्षेत्राला देखील चालना देत आहे. मासेमारी आणि मेंढपाळांना शेतकरी म्हणून गृहित धरत त्यांना किसान क्रेडिट कार्ड दिले जात आहे. त्यांच्यासाठी प्राथमिक पातळीवर दोन लाख सोसायटी स्थापन करण्याची तरतूद आहे. या माध्यमातून त्यांना व्यवसाय करण्यासाठी माफक दरात कर्जाची सुविधा उपलब्ध होईल.

देशभरात सुमारे ८ लाख सहकारी सोसायट्या आहेत आणि त्याचे२९ कोटींपेक्षा अधिक सदस्य आहेत. एकूण ११ प्रकारच्या सहकारी समित्या आहेत आणि त्यात प्राथमिक समित्यांशिवाय ब्लॉक, तहसील, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील फेडरेशनबरोबरच जिल्हा आणि राज्यस्तरीय सहकारी बँकांचा समावेश आहे. यानुसार प्रजासत्ताक अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून जगभरातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाच्या विकासाची नवीन गाथा लिहिली जात आहे आणि ही बाब प्रत्येक व्यक्तीला विकासाच्या प्रवाहात सामील करत विकसित भारताचा मार्ग प्रशस्त करेल, यात तिळमात्र शंका नाही.





धोरण

# दिलासादारक वेतनसुधारणा


अभिजित मुखोपाध्याय
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ


***केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) च्या वेतनात सुधारणा केली. यानुसार वेगवेगळ्या राज्यांत सुमारे चार ते दहा टक्के वेतनवाढ करण्यात आली आहे. ही वाढ निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन केल्याचेही काही जण म्हणत आहे. पण हा उद्देश असला तरी वेतन वाढविण्याचा निर्णय योग्य आहे आणि अशा वाढीची प्रतीक्षा बऱ्याच काळापासून होती. मजुरांना काही अंशी महागाईपासून दिलासा मिळणार आहे. मजुरी वाढल्याने विविध कल्याणकारी योजना यशस्वी करण्यात सहकार्य मिळेल आणि काही योजनांवरचा दबाव देखील कमी राहील. त्यामुळे ही नवीन किमान वेतन व्यवस्था लवकरच आकारास येईल, अशी आशा आहे.***

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) च्या वेतनात सुधारणा केली. यानुसार वेगवेगळ्या राज्यांत सुमारे चार ते दहा टक्के वेतनवाढ करण्यात आली आहे. अर्थात ही वाढ निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन केल्याचेही काही जण म्हणत आहे. अर्थात हा उद्देश असला तरी वेतन वाढविण्याचा निर्णय योग्य आहे आणि अशा वाढीची प्रतीक्षा बऱ्याच काळापासून होती. मजुरांना काही अंशी महागाईपासून दिलासा मिळणार आहे.

वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळ्या दराने वेतन किंवा मजुरी वाढवताना स्थानिक पातळीवर दैनंदिन जीवनात येणारा खर्च हा प्रमुख आधार आहे. या वाढीनंतर मनरेगा कामगारांची हरियानात सर्वाधिक ३७४ रुपये आणि अरुणाचल प्रदेश आणि नागालँडमध्ये सर्वात कमी २३४ रुपये एवढी मजुरी निश्चित झाली आहे. सिक्कीमच्या तीन ग्राम पंचायतीच्या हद्दीत देखील मनरेगा कामगारांना ३७४ रुपये मिळतील. पश्चिम बंगालमध्ये तेरा रुपयांच्या वाढीसह २५० रुपये तसेच बिहारमध्ये १७ रुपयांच्या

वाढीसह मजुरी २२८ रुपये मजुरांना मिळणार आहेत. अर्थात मजुरीत वाढ करताना कोणकोणत्या आधारभूत घटकांचा विचार केला, हे मात्र स्पष्ट झालेले नाही. वाढीचा दर चार ते दहा टक्के असला तरी ही किमान वाढ आवश्यक होती हे सिद्ध झाले आहे.

ग्रामीण विकास आणि पंचायत राजच्या संसदीय स्थायी समितीच्या अहवालात म्हटले, विविध राज्यांत मनरेगाच्या मजुरीत बरीच तफावत दिसून येते. मजुरांना दिला जाणारा भत्ता हा सध्याच्या वाढत्या खर्चाच्या अनुरुप नाही, असेही समितीने म्हटले आहे. पण कालांतराने मजुरीत सुधारणा करताना या गोष्टींचा विचार करायला हवा. ज्या राज्यांकडे अधिक उत्पन्नांचे स्रोत आहेत, तेथे मजुरी अधिक मिळत असल्याचे दिसून येते. पण मजुरीत वाढ करताना राज्यांच्या स्थितीचे आकलन करू नयें, कारण मनरेगा ही भारत सरकारची योजना आहे. वेगवेगळ्या ठिकाणच्या खर्चात फरक आहे. मात्र मुलभूत गोष्टी जसे खाण्यापिण्याच्या वस्तू महाग होत आहेत आणि महागाईचे चटके सर्वत्रच बसत आहेत. त्यामुळे स्थायी समितीच्या प्रस्तावानुसार मजुरीतील तफावत देखील कमी करायंला हवी आणि त्यात समानता आणून योग्य रितीने वाढ करायला हवी. यानुसार मजुरांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह योग्य रितीने करता येईल.

मजुरीच्या संदर्भात काही दिवसांपूर्वी एक बातमी आली. केंद्र सरकार आता किमान वेतनाच्या (प्रत्येक पातळीवर) च्या व्यवस्थेत बदल करत नवीन व्यवस्था आणण्याचा विचार करत आहे आणि त्यानुसार किमान मजुरी निश्चित करताना दैनंदिन खर्चाचे आकलन केले जाणार आहे. याकामी सरकार आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेसारख्या संस्थेची मदत घेण्याचा विचार करत आहे. विशेष म्हणजे यापूर्वी शेवटची वेतन सुधारणा २०१७ मध्ये झाली होती. यानुसारच किमान मजुरीचा दर निश्चित करण्यात आला. तसेच किमान मजुरी देण्याच्या नियमांचे पालन देखील योग्य रितीने केले जात नसल्याचे आढळून आले आहे. पण आता नव्या व्यवस्थेत यासंदर्भात ठोस तरतुदी करणे गरजेचे आहे. किमान मजुरी असो किंवा दैनंदिन खर्चाच्या हिशोबाने दिली जाणारी मजुरी असो कामगारांना जर योग्य मोबदला मिळाल नाही तर अशा व्यवस्थेचा उद्देशच अर्धवट राहिल. सध्या नव्या व्यवस्थेबाबत चर्चा सुरू आहे असून उदरनिर्वाह योग्य रितीने व्हावा आणि पालनपोषण चांगले होईल हाच आधार मजुरी निश्चित करताना राहिल, असे म्हटले जात आहे. याचाच अर्थ केवळ दोन वेळच्या भोजनासाठी सोय नाही तर घर, शिक्षण, आरोग्य या गोष्टींची देखील दखल घ्यावी लागणार आहे. मनरेगाची मजुरी ही ग्रामीण भागात काम करणाऱ्या लोकांसाठी मोठा आधार ठरत आहे. या कारणामुळे अनेक मजुरांना त्याचा फायदा मिळाला आहे. चांगल्या जीवनशैलीच्या हिशोबाने किमान मजुरीत निश्चित वाढ होईल, अशी अपेक्षा बाळगली जात आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सहकार्य घेणे देखील उत्साहजनक आहे. कारण या संस्थेकडे जगभरातील अनुभव आणि विविध प्रकारचे संशोधन अहवाल आहेत. ग्रामीण व्यवस्थेसाठी नवीन आराखडा तयार केला जात असेल तर त्याला मनरेगा देखील जोडायला हवे. परिणामी मजुरी निश्चितीतील सध्याच्या उणिवा दूर करत नियमित रुपाने दुरुस्ती करता येऊ शकेल. सध्याच्या व्यवस्थेत या गोष्टींचा अभाव दिसून येतो. नव्या व्यवस्थेत उदरनिर्वाहासाठीचा खर्च आणि महागाई दर याचा ताळमेळ साधत तार्किक आधारावर मजुरीत बदल होत राहील.

कोरोनासारख्या महासाथीमुळे कामगारांची स्थिती शोचनीय झाली, यात कोणाचेही दुमत नाही. मात्र योग्य मोबदल्या दिल्यास आर्थिक विषमतेची दरी काही प्रमाणात कमी होईल आणि मजुरी वाढल्याने कामगारांची क्रयशक्ती देखील वाढेल. बाजारात पैसा आल्यास मागणी आणि उत्पादन क्षेत्रावर सकारात्मक परिणाम होईल. आपली अर्थव्यवस्था वेगाने वाढत असून त्यात मजुरांची मोठी भूमिका आहे. मात्र आर्थिक वृद्धीचा लाभ गरजुंपर्यंत पोचत नसल्याचे दिसून येत आहे. मजुरी वाढल्याने विविध कल्याणकारी योजना यशस्वी करण्यात सहकार्य मिळेल आणि काही योजनांवरचा दबाव देखील कमी राहील. त्यामुळे ही नवीन किमान वेतन व्यवस्था लवकरच आकारास येईल, अशी आशा आहे.



मेन स्टोरी

# लाट उष्णतेची, गरज सजगतेची

रंगनाथ कोकणे
पर्यावरण अभ्यासक

***दिवसामागून दिवस चालले, ऋतू मागून ऋतू... असे म्हणत असताना हवामान बदलांमुळे ऋतू तीव्र होताहेत, याचीही जाणीव मानवाला आता प्रकर्षाने होऊ लागली आहे. जागतिक तापमानवाढीच्या आजच्या काळात उन्हाळ्याचा ऋतू दाहक होत आहे. दीड-दोन दशकांपूर्वी तापमानाचा पारा चाळीशी पार गेला की ठळक बातमी व्हायची. आता तो पन्नाशीपर्यंत जात आहे. पाच ते दहा अंश तापमानातील वाढ ही मानवाबरोबरच पीकांसाठी, प्राणीमात्रांसाठी किती त्रासदायक ठरत असेल याबाबतचा गांभीर्याने विचार करणार आहोत का? एसीच्या रिमोटने दीड-दोन अंशांनी तापमान कमी करुन थंडगार वातावरणात बसून याचे उत्तर सापडणार नाही. त्यासाठी प्रदूषणकपात, वृक्षसंपदेत वाढ आणि निसर्गाचे दोहन शून्यावर आणणे गरजेचे आहे. निसर्गानुरुप जीवनशैली अंगिकारली नाही तर येणाऱ्या भविष्यात तापमानवाढीचे चटके मानवाला होरपळून टाकतील.***

---

उष्णकटिबंधात येणाऱ्या भारतात दरवर्षी उन्हाळ्याचे एप्रिल आणि मे हे दोन महिने नागरीकांसाठी प्रचंड त्रासदायक ठरतात. विशेषतः जागतिक तापमानवाढीमुळे होणाऱ्या हवामान बदलांच्या काळात उन्हाळ्याची तीव्रता वाढत चालली आहे. साधारण १०-१५ पूर्वीचा काळ उठवून पाहिल्यास महाराष्ट्रात तापमानाचा पारा चाळीशीला गेला की माध्यमांमधून मथळे झळकताना दिसायचे. पण गेल्या पाच वर्षांमध्ये राज्यातील अनेक शहरांमध्ये-गावांमध्ये तापमान मार्चच्या उत्तरार्धात किंवा एप्रिलमध्येच चाळीशी गाठताना दिसत आहे. हवामान बदलाचे हे दृश्य परिणाम आहेत. यंदा विदर्भात तापमानाच्या पाऱ्यात वेगाने वाढ होत आहे. कमाल तापमानसह किमान तापमान देखील वाढत आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यामध्ये विदर्भात पारा ४२ अंश सेल्सिअस पलीकडे गेला आहे. भारतीय हवामान खात्याने आठवड्याच्या अखेरीस पावसाचा अंदाज व्यक्त केला असला तरीही उष्णतेच्या लाटेचा इशारा देखील दिला आहे. मंगळवारी (दि. २ एप्रिल रोजी) विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद ब्रह्मपुरी येथे ४२.३ अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली. तर वर्धा, यवतमाळ, वाशीम आणि अकोला शहरात तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सिअस पेक्षा

अधिक होता. भारतीय हवामान खात्याने एप्रिल आणि मे महिन्यात तापमानात आणखी वाढ होण्याची इशारा दिला आहे. सरासरी पेक्षा तापमान अधिक राहण्याची शक्यता असल्याने यावर्षी विदर्भात तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

देशभरात एप्रिल ते जून पर्यंत उष्णतेची लाट असण्याची शक्यता आहे. याचा मध्य व पश्चिम किनारपट्टीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.भारतीय हवामान विभागाने देशात येत्या काही दिवसात कमाल तापमानात २ ते ३ डिग्री सेल्सिअस वृद्धी होण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे येणारा काळ हा सर्वांनीच सजग राहण्याचा आहे. विशेषतः उष्माघातासारख्या संकटांपासून बचाव करण्यासाठी वैयक्तिक काळजी घेण्याबाबत कुचराई करणे जीवावर बेतू शकते.

उन्हाळ्यात एकीकडे तापमानाच्या वाढत्या पाऱ्याचा त्रास सोसतानाच पाणीटंचाईचा सामनाही मोठ्या लोकसंख्येला करावा लागतो. केंद्रीय जल आयोगाने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीवर नजर टाकल्यास भारतातील नद्या सतत कोरड्या पडत आहेत, असे दिसून येते. महानदी आणि पेन्नारदरम्यान पूर्वेकडे वाहणाऱ्या १३ नद्यांमध्ये पाणी नाहीये. यामध्ये रुशिकुल्य, बहुदा, वनसाधरा, नागवली, शारदा, वराह, तांडव, एलुरु, गुंडालकम्मा, तामिलेरू, मुसी, पालेरू आणि मुनेरू यांचा समावेश होतो. आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि ओडिशा या राज्यांतील ८६,६४३ चौरस किमी क्षेत्रातून वाहणाऱ्या नद्या थेट बंगालच्या उपसागरात येतात. या खोऱ्यातील शेतजमीन एकूण क्षेत्रफळाच्या सुमारे ६० टक्के आहे. उन्हाळा शिगेला पोहोचण्यापूर्वीच या नद्यांची परिस्थिती चिंताजनक बनली होती. या खोऱ्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये विशाखापट्टणम, विझियानगरम, पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी, श्रीकाकुलम आणि काकीनाडा यांचा समावेश होतो. सद्यस्थितीत देशातील १५० प्रमुख जलाशयांमधील पाणी साठवण क्षमतेत ३६ टक्क्यांनी घट झाली आहे. त्याचवेळी, ८६ जलाशयांमध्ये ४० टक्के किंवा त्याहून कमी जलसाठा आहे. केंद्रीय जलआयोगाच्या माहितीनुसार, यापैकी बहुतेक जलाशये दक्षिणेकडील राज्ये, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये आहेत. देशातील ११ राज्यांमधील सुमारे २,८६,००० गावे गंगा खोऱ्यावर वसलेली असून तिथे पाण्याची उपलब्धता हळूहळू कमी होत आहे. कर्नाटक आणि तेलंगणासारखी राज्ये पावसाअभावी दुष्काळाच्या झळा सोसत आहेत. या भागातील ७.८ टक्के भाग हा अत्यंत दुष्काळी स्थितीत आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा, सिंधू, कावेरी या खोऱ्यातील अनेक भागही दुष्काळाचा सामना करत आहेत. देशातील किमान ३५.२ टक्के क्षेत्र सध्या असामान्य ते विलक्षण दुष्काळाखाली आहे. यातील ७.८ टक्के क्षेत्र अतिदुष्काळी आहे.

महाराष्ट्राचा विचार करता राज्यातील तापमानात वाढ होत असल्याने बाष्पीभवनाचा वेग वाढला आहे. परिणामी, धरणांमधील पाणीसाठ्यात घट होत असून ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासह सिंचनाच्या पाण्याचीही स्थिती बिकट बनण्याची शक्यता आहे. राज्यातील सहा महसूल विभागातील धरणसाठ्यात ४३.७८ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. गतवर्षी याच कालावधीत धरणसाठा ६०.५७ टक्के इतका होता. पुण्यासारख्या महानगराजवळील उपनगरांमध्ये पाणीटंचाई भीषण बनली आहे. पुणे विभागातील एकूण ७२० धरणांमध्ये गतवर्षी ७०.२८ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. यंदा तो ४५.०७ टक्क्यांवर घसरला आहे. राखीव पाणीसाठ्यासह मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा हा जेमतेम जुलै अखेरपर्यंत मुंबईची तहान भागेल इतकाच आहे. जूनमध्ये पाऊस लांबणीवर गेल्यास १० ते १५ टक्के पाणीकपात करावी लागू शकते.

भारतात उन्हाळ्यातील तापमानावर आणि मान्सूनच्या पावसावर एल निनोचा प्रभाव राहतो. यंदा एल निनोची स्थिती किमान मे पर्यंत कायम राहण्याची शक्यता असल्याने भारतात यावर्षी अधिक उष्णता आणि उष्णतेच्या लाटेचे दिवस जाणवतील, असे सांगण्यात आले आहे. हवामान शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की २०२४ च्या मे-जूनमध्ये सर्व जुने उष्णतेचे रेकॉर्ड मोडले जाण्याची शक्यता आहे. कारण विषुववृत्तीय प्रशांत महासागरात अल निनोची स्थिती कायम आहे. त्याच वेळी, पॅसिफिक महासागराच्या तापमानात वाढ झाली आहे. गतवर्षीच्या मान्सूनवर एल निनोचा प्रभाव राहिल्यामुळे देशात समाधानकारक पाऊस न बरसल्यामुळे यंदा पाणीटंचाईचे संकट भेडसावणार आहे. पावसाअभावी उष्णता वाढली आहे. वाऱ्यांच्या वाढत्या वेगामुळे आता उष्ण हवेचा झोत जाणवू लागला आहे. ग्लोबल वॉर्मिंग आणि एल निनो या घटना याला कारणीभूत आहेत. भविष्यात उष्णतेची लाट आली तर त्याचे कारणही तेच असेल. कारण या दोन्ही कारणांमुळे जगभरात जमिनीवरील तसेच महासागरावरील तापमानात सातत्याने वाढ होत आहे.

हे झाले संकटाचे वास्तव ! या संकटाच्या कारणांमध्येच

उपायही दडलेले आहेत. म्हणजे असे की, वर्षानुवर्षे उन्हाळा तीव्र झाल्यामुळे पाणीटंचाई जाणवण्यामागे आपल्या जलनियोजनातील उणिवा आहेत. गेल्या १०० वर्षांच्या काळातील पावसाच्या नोंदी उपलब्ध असून एकही वर्ष पाऊस पडलाच नाही असे घडलेले नाही. पण तरीही दुष्काळाची समस्या सातत्याने जाणवते. कारण पडणाऱ्या पावसाचे नियोजन आपण आजही गांभीर्याने करत नाही. पाणी अडवा, पाणी जिरवा, मागेल त्याला शेततळे, जलयुक्त शिवार यांसारख्या योजना वेळोवेळी शासनाकडून राबवल्या जातात. त्यांची परिणामकारकताही दिसून येते. पण संकटाच्या तुलनेत अधिक प्रभावीपणाने उपाययोजना करण्याची गरज आहे. धरणांमधील गाळ काढून त्यांची साठवणूक क्षमता वाढवण्याबरोबरच बंदिस्त नलिकांमधूनच पाणी प्रवाहित करुन बाष्पीभवनाच्या समस्येवर मात करण्यापर्यंत अनेक उपाययोजना जलतज्ज्ञांनी आजवर सुचवून झालेल्या आहेत. धरणांच्या देखभाल-दुरुस्तीबाबतही अनेक अहवाल शासनाला दिले गेले आहेत. परंतु आजही याबाबत खूप मोठा पल्ला गाठण्याची गरज आहे. दुसरीकडे वैयक्तिक पाणी वापराबाबतचा ढिसाळपणा आणि बेजबाबदारपणा आजही कमी झालेला नाहीये. महानगरे-शहरांमधून रेनवॉटर हार्वेस्टिंगची सक्ती करुनही प्रत्यक्ष जमिनीस्तरावर त्याची अमलबजावणी पूर्णपणाने झालेली नाहीये. आकाशातून पडणारा पाऊस जमिनीत मुरवला नाही तर भूजलाची पातळी वाढणार कशी? पण त्याबाबत कठोरपणा दाखवण्याऐवजी भूजलाच्या पाण्यावर शहरांजवळ उपनगरांचा विकास बेसुमारपणे होत आहे. भूजलाच्या पाणीउपशातून उसासारखी पीके घेतली जात आहेत. निसर्गाचे हे दोहन शाश्वत कसे म्हणता येईल? परिणामी आज भूजलपातळी तळाशी गेल्यामुळे अनेक उपनगरांना, शहरांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. सिंगापूर, इस्राईलसारख्या देशांनी पाण्याच्या पुनर्वापराबाबतचे आधुनिक तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्याचा वापर करुन आपण वाया जाणारे पाणी पुन्हा वापरात आणण्याऐवजी नद्यांचे प्रवाह बदलण्याचे हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प राबवण्यात मग्न आहोत. त्यामुळे दरवेळी उन्हाळ्यात जलनियोजनाबाबत चर्चा करुन चालणार नाही तर आपल्याला सर्वसमावेशक धोरण ठरवावे लागणार आहे.

